304

तात्काळ अंमलबजावणी
उप मुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ)
स्थानिक निधी ... विभाग
जावक क्र. ...
दिनांक ... 23 APR 2007

# महाराष्ट्र शासन

मुख्य लेखापरीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
कोकणभवन, सहावा माळा,
नवी मुंबई ४०० ६१४
दिनांक:- 5 APR 2007

## कार्यालयीन आदेश क्रमांक २६ दिनांक ५/०४/२००७

असे निदर्शनास आले आहे की, माहे मार्च २००७ अखेर २,०४,३७४ ग्रामपंचायत घटक
लेखापरीक्षणा आभावी प्रलंबित आहेत. ग्रामपंचायत लेखापरीक्षण कार्यपध्दती मधील परिच्छेद क्र.
२.१०(३) आस्थापना व कार्यपध्दती अन्वये प्रलबीत लेखापरीक्षणास प्राधान्य देणे आवश्यक आहे.
त्याचप्रमाणे प्रलंबित लेखापरीक्षण प्राधान्याने हाती घेणे याबत या कार्यालयाकडुन वारंवार सुचना देण्यात
आल्या आहेत. तथापी प्रलंबित लेखापरीक्षणास योग्य प्रमाणात प्राधान्य दिले जात नाही ही वस्तुस्थिती
आहे .परीणामी प्रलंबित घटकांच्या संख्येत सतत वाढ होत आहे. ही अत्यंत गंभीर बाब आहे. त्यामुळे या
विभागाच्या कार्यक्षमते बाबत सुध्दा प्रश्न उपस्थित होत आहेत. अनेक वेळा या प्रकरणी
मा.आमदारांकडुन विधी मंडळात तारांकीत प्रश्न उपस्थित केले जातात. त्यास समर्पक उत्तर देणे अत्यंत
जिकरीचे होते. प्रलंबित घटकांच्या लेखापरीक्षण परीस्थितीत सुधारणा करण्याच्या दृष्टीकोनातुन आता
खालीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

१) माहे एप्रिल २००७ पासुन करावयाच्या ग्रामपंचायत लेखापरीक्षणात सन २००६-०७
या चालु लेखापरीक्षण घटकांचा समावेश करण्यात येवु नये कटाक्षाने सन २००६ पुर्वीचे लेखापरीक्षणच
हाती घेण्यांत यावे.

२) अभिलेख उपलब्ध होत नाहीत अशा प्रकरणी ग्रामपंचायत लेखापरीक्षण नियमावली
१९६१ नियम १० व ११ प्रमाणे ग्रामसेवक,सरपंच,गटविकास अधिकारी यांना नियमाप्रमाणे नोंदणीकृत
डाकेने नोटीसा देण्यात याव्यात त्यांनतरही अभिलेख उपलब्ध न झाल्यास मुख्य लेखापरीक्षक
कार्यालयाचे आदेश क्र. ९० दिनांक २८/७/२००६ अन्वये रितसर लेखापरीक्षण अहवाल निर्गमीत
करण्यांत यावा.

३) उपरोक्त प्रमाणे कार्यवाही जो पर्यंत प्रलंबित घटकांचा निपटारा होत नाहीत तो
पर्यंत चालु राहील व त्याचा मुख्य लेखापरीक्षक कार्यालय स्तरावर वेळोवेळी आढावा घेण्यात येईल. या
दरम्यान कोणत्याही उपमुख्य लेखापरीक्षक/ सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी यांनी सन २००६-०७ या
वर्षाचे लेखापरीक्षण करण्यास मंजुरी देवु नये. अशा परिस्थितीत कोणत्याही लेखापरीक्षकाने सन २००६-
०७ च्या घटकांचे परस्पर लेखापरीक्षण केले असल्याचे पुढे केव्हाही निदर्शनास आले तर अशा
ग्रामपंचायत लेखापरीक्षकांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल व त्यास त्यापुढे कधीही
ग्रामपंचायत विभाग पदस्थापना देण्यात येणार नाही. याची सक्त नोंद घेण्यात यावी. त्याचप्रमाणे संबंधीत
उपमुख्य लेखापरीक्षक यांनी सुध्दा उपरोक्त सुचनांची योग्य प्रकारे अंमलबजावणी करावी. ग्रामपंचायत
भेटी दरम्यान लेखापरीक्षण चालु घटकांचे लेखापरीक्षण करीत असल्याचे आढळल्यास त्यांनी ही बाब